## ४०. असु अम्ही सुखाने

असु अम्ही सुखाने पत्थर पायातील
मंदीर उभविणे हेच आमुचे शील ।। ध्रु. ।।

आम्हास नको मुळी मान मरातब काही
कीर्तीची आम्हां चाड मुळीही नाही
सर्वस्व अर्पिले मातृभूमिचे ठायी
हे दैवत अमुचे ध्येय मंदिरातील ।। १।।

वृक्षांच्या शाखा उंच नभांतरि जावो
विश्रांति सुखाने विहगवृंद त घेवो
जरि देईल टकरा नाग बळाने देवो
करू अमर पाजुनि रस पाताळातील ।। २।।

जरि असेल ठरले देवत्वाप्रत जाणे
सोसून टाकिचे घाव बदलवू जिणे
गुणसुमने आम्ही विकसित करु यत्नाने
पावित्र्ये जीवन का न होई तेजाळ ।। ३।।